MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२४४ | सोमवार दि.२७ मे २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -244 | MONDAY DT. 27 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## सूर्य आग ओकतोय, या शहराचे तापमान पोहचले ५० अंश सेल्सियसवर, ७२ तासांत २४ मृत्यू

हळसहशीीं िंशाशिीर्रीीश ळप ळपवळर: रविवारी सकाळपासून ढगाळ वातावरण असून हवामान खात्याने ठाणे, मुंबईसह रायगडच्या काही भागात २७ ते २९ मे दरम्यान मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा इशारा दिला आहे. दुसरीकडे राजस्थानमधील फलोदी या शहराचे तापमान ५० अंश सेल्सियस गेले आहे.महाराष्ट्रातील अनेक शहरांचे तापमान ४० अंश सेल्सियसवर गेले आहे. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील तापमान ४५ अंश सेल्यियसवर पोहचले आहे. त्यानंतर या भागातील जिल्ह्याधिकाऱ्यांनी जमावबंदी लागू केली आहे. परंतु राजस्थानमधील फलोदी या शहराचे तापमान ५० अंश सेल्सियस गेले आहे. या परिसरात गेल्या ७२ तासांत उष्मघातामुळे २४ जणांचा मृत्यू झाला आहे. राजस्थानमध्ये गेल्या आठड्यापासून तापमानात प्रचंड वाढ झाली आहे.

# धनंजय मुंडे हे पालकमंत्री म्हणून नव्हे तर परळीचे आमदार म्हणून दाऊतपुर सह परळी तालुक्यातील मागासवर्गीयांना संरक्षण द्या!

## दाऊदपूर येथील मागासवर्गीय तरुणांना मारहाण प्रकरणी काचगुंडे बंधुवर अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल



१

■ मंत्री धनंजय मुंडे हे परळीचे आमदार आहेत परळी मतदारसंघांमध्ये या अगोदर सुद्धा दलितांवरती अनेक अत्याचार झालेले आहेत परंतु या लोकसभेच्या निवडणुकी अनुषंगाने छोट्या छोट्या जाती धर्मातील लोकांना हाणमार या मतदारसंघांमध्ये जास्त प्रमाणात होऊ लागल्याची चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये गाजत आहे पालकमंत्री म्हणून

नवे पण धनंजय मुंडे यांनी परळीचे आमदार म्हणून या मतदारसंघांमधील जनतेकडे लक्ष देणे हे काळाची गरज आहे कारण याच मतदारसंघावर धनंजय मुंडे हे आमदार झालेले आहेत स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या विचारावरती चालणारे राजकारण हे आता परळी मतदारसंघांमध्ये नवे तर महाराष्ट्र मध्ये सुद्धा राहिलेले नाही अशी ही भावना यावेळी लोकांच्या तुलनायकाला मिळत आहे

२

■ पंधरा पंधरा दिवस पोलीस स्टेशनला चकरा मारून सुद्धा परळी शहर पोलीस स्टेशन परळी ग्रामीण पोलीस स्टेशन परळी संभाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये तक्रार पोलीस अधिकारी घेत नाहीत तर यावेळी याच ट्रॉसिटी मध्ये नव्हे तर या अगोदर सुद्धा अनेकदा तक्रारी आल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनचे अधिकारी हे एक मोठ्या माणसाच्या फोनची वाट पाहत बसत आहेत परंतु यावेळी मात्र या ट्रॉसिटी मध्ये डीवायएसपी यांच्यापर्यंत हे प्रकरण गेल्यानंतर पंधरा दिवसानंतर याच्यामध्ये ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल झालेला आहे संबंधित पोलीस अधिकारी हे कोणाच्या इशारा वरती चालत आहेत हे मात्र अजूनही कोणाला कळाले नाही असे त्या अधिकाऱ्यांना वाटते परंतु परळीची यंत्रणा ही एका माणसाच्या फोनवरती हलत असून तो व्यक्ती कोण आहे यावरती चर्चा करण्याची गरज राहिलेली नाही



## अद्याप आरोपी मोकाट, परळी ग्रामीणच्या पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष?

■ *पालकमंत्री या नात्याने धनंजय मुंडे यांनी सर्व जाती धर्मातील लोकांची एक परळी शहरांमध्ये बैठक घेऊन सर्वांना समजून सांगत प्रत्येक गावांमध्ये समता बंधुता बंधू भगिनींचे नाते जोपासण्यासाठी सर्व जाती धर्मांना एकत्र करण्याची गरज आहे परंतु धनंजय मुंडे हे परळीपेक्षा जास्त बाहेरच असतात म्हणून हे सत्र घडत असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे? कोणाच्या इशारा पोलीस नसतात परळी मधील ग्रामीण पोलीस स्टेशन शहर पोलीस स्टेशन संभाजीनगर पोलीस स्टेशन जोपर्यंत वरून फोन येत नाही तोपर्यंत गुन्हा दाखल नाही होत.?*

परळी /प्रतिनिधी

बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या परळी विधानसभा मतदारसंघातील दाऊतपूर या गावात मागासवर्गीय लोकांवरती अन्याय व अत्याचाराची घटना घडली आहे, मागासवर्गीय कुटुंबातील चार युवकाला, जातिवाच शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये भादवी ३२४, ५०४ ,५०५, ३४,अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यांतर्गत ३(१)(ी), ३(२)(पाच) तसेच ३(२)(ीी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### परळी तालुक्यात अनेक ठिकाणी दलित समाजाला सूडबुद्धीच्या राजकारणाने हाणमारीचे सत्र सुरूच धनंजय मुंडे यांनी लक्ष देण्याची गरज?

दाऊतपुर येथील गावगुंड ज्यांच्यावर या अगोदर ३०२ सारखे गुन्हे व औष्णिक विद्युत केंद्रात ब्लास्टींग करण्यासारखे गुन्हे नोंद आहेत. अशा गुंड लोकांनी जाणीवपूर्वक हा हल्ला केला व जिवे मारण्याची धमकी दिली आहे. यांना तात्काळ अटक करून योग्य कारवाई मागणी करण्यात आली आहे. दाऊदपुर येथील चार जनावर गुन्हा नोंद झाला आहे त्यातील आरोपी मारुती उत्तम काचगुंडे, ज्ञानदेव बाबुराव काचगुंडे, खंडू उत्तम काचगुंडे, वैजनाथ बाबुराव काचगुंडे व त्यांचे सहकारी यांनी जातिवाचक शिवागाळा करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी गुन्हा नोंद झाला असून अद्याप हे आरोपी मोकाट फिरत असल्याची माहिती समोर येत आहे.परळी ग्रामीण पोलिसांकडून आरोपीला अभय दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणी आकाश आश्रुबा मुंडे यांच्या सह इतर पिडीत कुटुंबियांना न्याय मिळावा अशी मागणी करण्यात येत आहे. यांच्या जीवितास धोका आहे व यांना जिवे मारण्याची धमकी दिल्या जात आहेत.अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा नोंद करण्यासाठी आकाश मुंडे व पिडित तरुणांना जवळपास पंधरा दिवसाचा कालावधी लागला, यामध्ये राजकीय दबाव असल्याची माहिती समोर येत आहे. दाऊतपुर येथे या गावगुंडांचा प्रचंड त्रास असून या अगोदर तीन वेळेस मारहाण झाली आहे.आशी माहिती समोर आली आहे. तरी या प्रकरणात बीड पोलीस प्रशासनाने ठोस भूमिका घेऊन योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी दाऊतपुर येथील मागासवर्गीय आकाश आश्रुबा मुंडे चे कुंटुंबीय इतर पीडित तीन तरुण करत आहे.

## बीडमध्ये पराभवाच्या भीतीने फेरमतदानाची मागणी; सुनील तटकरे यांची टीका


**मुंबई : विरोधकांना लोकसभा निवडणुकीत राज्यात पराभव होणार याची खात्री आहे. त्यामुळे मतदान केंद्रे ताब्यात घेऊन बोगस मतदान झाल्याचा कांगावा विरोधी पक्षांमधील नेते करीत आहेत. त्यांनी मतदानास पंधरा दिवस उलटल्यानंतर फेरमतदानाची मागणी करणे हास्यास्पद आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर केली. पवार आणि सुळे यांना आता काही कामच उरले नसल्याने ते आरोप करीत असल्याचे तटकरे यांनी नमूद केले.**






बीड व अन्य काही ठिकाणी बोगस मतदानाची तक्रार करीत फेरमतदानाची मागणी शरद पवार व सुळे यांनी केली आहे. यासंदर्भात बोलताना तटकरे म्हणाले की, फेरमतदानाची मागणी मतदानाच्या दिवशी सायंकाळी किंवा दुसऱ्या दिवशी होऊ शकते. पण १५-२० दिवसांनंतर मागणी करण्यात आली, याचा अर्थ विरोधकांना निवडणुकीचे निकाल काय लागणार आहेत, यांचा अंदाज आलेला आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसची मुंबईत गरवारे क्लब हाऊसमध्ये सोमवारी सकाळी ११ ते १ या वेळेत बैठक आहे. बैठकीला खासदार, मंत्री, आमदार, पक्षाचे लोकसभा उमेदवार, सर्व जिल्हाध्यक्ष उपस्थित राहणार आहेत. पक्षाचा १० जून रोजी वर्धापनदिन साजरा होणार असून त्यानिमित्त मुंबई, दिल्लीमध्ये कार्यक्रम होतील. या बैठकीत बड्या नेत्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश होणार आहेत. राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारे हे प्रवेश असतील, असे तटकरे यांनी स्पष्ट केले.



## वादळी वाऱ्याचा तडाखा वीज पुरवठा खंडित

परळी / प्रतिनिधी

मागील अनेक दिवसांपासून ४० अंशावर गेलेल्या तापमानाने परळी शहर व तालुक्यात होरपळून निघाला असताना रविवार रोजी दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला.अचानक आलेल्या या वादळी वाऱ्याने अनेकांची तारांबळ उडाली.

परळी शहर व तालुक्यात रविवार दि २६ रोजी दुपारच्या सुमारास सोसाट्याच्या वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाट होऊन हलक्या स्वरूपाचा अवकाळी बरसला.तासी ४० ते ५० किमी पेक्षा अधिक वेगाने वारे वाहून पाऊस पडत असल्याने अनेकांची तारांबळ उडाली.शहरात अनेक भागात झाडे तुटून रस्त्यावर पडली, विजेचे खाब वाकडी झाली.दुकानावरील फलक रस्त्यावर येऊन पडली तर ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांच्या पत्र्याच्या घराचे नुकसान झाले.शहरात विजेचा तारा तुटून पडल्याने अनेक भागात वीज पुरवठा खंडित झाला होता.

# सौ.संध्या नागुरे यांना राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार प्रदान

परळी ।प्रतिनिधी

येथील विद्यावर्धिनी विद्यालयाच्या शिक्षिका सौ. संध्या नागुरे (चौधरी) यांना महाराष्ट्र शिक्षक पॅनलतर्फे राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यावर्धिनी प्राथमिक विद्यालय परळी वैजनाथ येथील उपक्रमशील शिक्षका सौ. संध्या विश्वनाथ नागुरे यांना महाराष्ट्र शिक्षण पॅनल (एमएसपी) च्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार नाशिक येथील गुरूदक्षिणा हॉलमध्ये शुक्रवारी आयोजित विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.मराठी चित्रपट अभिनेत्री किशोरी शहाणे, कवी अनंत राऊत, शिक्षण फाऊंडेशनचे अध्यक्ष दीपक चामे यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले.




शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील बहुमूल्य योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव देऊन गुणवत्तेच्या सार्वत्रिकिकरण्यासाठी, राष्ट्रनिष्ठा समाजनिष्ठा ज्ञाननिष्ठा विद्यार्थी निष्ठेपाई कार्य करणार्या शिक्षक शिक्षकांचा नाशिक येथे २४ मे रोजी आयोजित सोहळ्यात सन्मान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र शिक्षक पॅनल बीड जिल्हा जिल्हा समन्वयक वैशाली अकुस्कर (बुरांडे) यांची प्रमुख उपस्थिती होती.

सौ संध्या नागूरे मॅडम या विद्यार्थीप्रिय शिक्षिका म्हणून सुपरिचित आहेत. त्यांनी २००६ पासून तिसरी व सहावी वर्गासाठी एमटीएस स्पर्धा परीक्षेचे आयोजन करून मोलाची कामगिरी बजावली आहे. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेसाठी प्रेरणा देत असतात. शालेय स्तरावरील विविध सांस्कृतिक कार्यक्रमात मुलांचा सहभाग वाढवून आपल्या शाळेसाठी विविध पारितोषिके मिळून दिली आहेत. मुलांना आनंददायी पद्धतीने शिक्षण देणे हा प्रामाणिक उद्देश राहिला असून गरजू मुलांना विविध शैक्षणिक साहित्याची वाटप करून त्यांना नेहमी प्रोत्साहन करत असतात. कोविड काळातही आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व कार्याची दखल घेऊन सदरील पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सदरील पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे सौ संध्या नागुरे मॅडम यांचे विविध क्षेत्रातील व्यक्तींकडून अभिनंदन होत आहे.

# श्री शिवाजी विद्यालयाचे विकास झुंझुरके यांची छात्रसेना अधिकारी म्हणून नियुक्ती

**बीड ।प्रतिनिधी**

**शहरातील प्रतिष्ठित श्री शिवाजी विद्यालयातील सहशिक्षक विकास बाबासाहेब झुंझुरके यांची छात्रसेना अधिकारी म्हणून नुकतीच नियुक्ती झाली. विकास झुंझुरके यांनी कामठी ( नागपूर )येथील ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी मध्ये ८ एप्रिल ते २२ मे २०२४ असे ४५ दिवसाचे निवासी आर्मी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. एन.सी.सी. मध्ये थर्ड ऑफिसर ही रँक ही त्यांनी प्राप्त केली आहे.**

४५ दिवसाच्या प्रशिक्षणामध्ये फायरिंग, ड्रिल, मॅप रीडिंग, फर्स्ट एड तसेच शारीरिक कवायती यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत.४५ दिवसाचे प्रशिक्षण घेऊन असोसिएटेड एनसीसी ऑफिसर होऊन थर्ड ऑफिसर ही रँकही त्यांनी प्राप्त केली आहे. झुंझुरके यांच्या यशाबद्दल संस्था सचिव दिनकरराव कदम, पदाधिकारी ड.जगन्नाथराव औटे, शकुंतलाताई लोळगे, पवनराव चौरे, आसाराम सुर्वे, शितलताई कदम यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे, उप मुख्याध्यापक राजकुमार कदम ,पर्यवेक्षक बि.डी. मातकर, गिरीष चाळक, शाळेचे माजी छात्रसेना अधिकारी जगदीश करपे यांच्यासह सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वागत केले आहे.



# बस स्टँड समोरील झाडे मोडून पडले

- बस स्टँड मधील हॉर्डींग खाली पडले
- महामार्गा शेजारी असलेल्या दुकानावरील पत्रे उडाली
- मोटार सायकल व स्कूटीचे नुकसान तर तिघे जखमी
- मुख्य रस्त्यावरील वाहतूक दीड तास ठप्प

केज / प्रतिनिधी

केज येथे अवकाळी वादळ आणि पावसाने बस स्टँड समोर झाडे मोडून पडली असून त्याच्या खाली एक मोटार सायकल दबलेले आहे. तसेच बस स्थानकात लावलेले होर्डींग सुद्धा पडले आहे. त्याच्या खाली एका स्कुटीचे नुकसान झालेले. यात तिघेजण किरकोळ जखमी झाले आहेत. त्यात एक वृद्ध महिला, एक वृद्ध पुरुष आणि एका १७ वर्षाच्या मुलाचा समावेश आहे. झाडे रस्त्यावर पडल्यामुळे बस स्टँड समोरील मुख्य महामार्गावरची वाहतूक सुमारे दीड तास ठप्प होती.

शनिवार दि. २५ मे रोजी सायंकाळी ५:०० केज येथे प्रचंड वेगाने वादळी वारे आणि पाऊस सुरू झाला. त्यात बस स्टँड समोरील मुख्य महामार्गा लगत असलेली जुने झाड आणि त्याच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या त्या खाली एक मोटार सायकल दबली आहे तसेच त्याच वेळी रस्त्याने जात असलेली प्रयागाबई मेघराज हाके वय (५० वर्ष) रा. माळेवाडी ता. केज, शिवाजी माणिक लांडगे वय (७० वर्ष) रा. पिसेगाव आणि ओंकार संतोष पारखे वय (१७ वर्ष) रा. केज हे जखमी झाले आहेत. तसेच बस स्टँड आवारात नवनाथ रसवंती शेजारी असलेले लोखंडी होर्डिंग तुटून खाली पडले. त्या होर्डिंग खाली एक स्कूटी क्र. (एम एच ४४/ए बी २३७८) दबून तिचे नुकसान झाले आहे.

मुंबईत होर्डींग पडून झालेली प्रन्ह प्राणहानी घटना ताजी असतानाच तोच प्रकार केज मध्ये झाला आहे. बस स्टँड मधील या होर्डींग शेजारी झाड असल्याने




अनेक वेळा सावलीसाठी तेथे प्रवाशी व नागरिक थांबलेले असतात. दरम्यान पाऊस सुरू असल्याने सुदैवाने तेथे कोणी प्रवाशी उभे नसल्याने जिवीतहानी टळली आहे. मात्र केज येथील बस स्टँडच्या परिसरात आणि मुख्य रस्त्यावर देखील अनेक होर्डिंग्ज आणि बॅनर्स लावलेले आहेत. त्याकडे नगर पंचायत आणि प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.त्याच बरोबर के ज तालुक्यातील हादगाव (डोका) येथील शेतातील डीपीचे सिमेंटचे खांब मोडून डिपी खाली



पडली तर शेतातील झाडे उन्मळून पडली आहेत आणि घरावरील पत्रे उडून नुकसान झाले आहे.


तसेच या वादळ वाऱ्यात रस्त्याच्या दुतर्फा असलेली चिकन सेंटर्स, भाजी विक्रेते आणि छोट्या व्यावसायिकांनी उभारलेला निवारे देखील उद्धस्त झाले आहेत.जखमींवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून दोघांना अंबाजोगाई येथे हलविले :- वादळी वाऱ्यात जखमी झालेल्या प्रयागाबई मेघराज हाके, शिवाजी माणिक लांडगे ओंकार संतोष पारखे यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात डॉ आयेशा मॅडम यांनी प्रथमोपचार केले. त्यातील जखमी प्रयागाबई मेघराज हाके, शिवाजी माणिक लांडगे या दोघांना अंबाजोगाई येथे पुढील उपचारासाठी पाठविले असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. केंद्रे यांनी दिली.

अनेक दुकानावरील पत्रे उडाले :- बस स्टँड जवळ महामार्ग लगतच्या अनेक दुकाना वरील लोखंडी टिन पत्रे या वाऱ्याने उडून गेली आहेत.

पोलीस धावले मदतीला :- वादळात झाड पडून वाहतूक खोळंबली असल्याची माहिती मिळताच पोलीस उपनिरिक्षक राजेश पाटील, वाहतूक शाखेचे गोरख फड, नितीन जाधव आणि पोलीस कर्मचारी यांनी हजर होत नागरिकांच्या मदतीने झाड हटवून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न केले. तर यावेळी नायब तहसीलदार सचिन देशपांडे देखील हजर होते.

# परळी तालुक्याला चक्रीवादळाचा तडाखा

## शहर व ग्रामीण भागात प्रचंड नुकसान अनेक घरांची पडझड





परळी / प्रतिनिधी

बंगालच्या उपसागरात एकीकडे रोमन चक्रीवादळ घोगावत असताना महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये अक्षरशः थैमान घातले आहे. अर्थात या दोन्ही वादळाचा एकमेकांशी काही संबंध आहे का हे सांग ना आता कठीण आहे पण महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये अचानक झालेल्या वातावरणातील बदल आत काही अंशी समुद्रात निर्माण झालेले चक्रीवादळ कारणीभूत ठरला आहे. दुसरीकडे बीड जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई यासह काही तालुक्यात आज झालेल्या चक्रीवादळासह मुसळधार पावसाने परळी तालुक्यात मोठे नुकसान झाले आहे अनेक घरांची पडझड मोठ्या प्रमाणात झाली आहे.

परळी, अंबाजोगाई तालुक्यात अचानक झालेल्या चक्रीवादळामुळे प्रचंड मोठे नुकसान झाले असून अनेकांच्या घरावरील पत्रे छापरा उडून गेले आहेत तर रस्त्याच्या कडेच्या लाईटचे पोल, झाडे उखडून पडली आहेत. अनेक भागातील लाईटच्या तारा तुटून पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला आहे. अगोदरच उकाड्याने हराम झालेल्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

# वादळी वाऱ्यात कारचा चुराडा, दोन अभियंता बालंबाल बचावले

## अंबाजोगाई तालुक्यातील पूस येथील घटना

अंबाजोगाई - तालुक्यातील पूस येथून अंगावर शहारे आणणारी घटना समोर आली आहे. रविवारी (दि.२६) दुपारी अचानक सुरू झालेल्या वादळी वाऱ्यात चक्क रोडवरील सिमेंट काँक्रीटची कमान जमीनदोस्त झाली. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही.पूसच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात येथील सुप्रसिद्ध पद्मावती देवी मंदिराची स्वागत कमान असून ती सिमेंट काँक्रीटची आहे. रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. वाऱ्याचा वेग एवढा प्रचंड होता की त्याच्या जोराने ही कमान कोसळली. यावेळी कमानीखाली उभ्या असलेल्या कारवर (टीएस ०८ एचएम ०२०९) कमान कोसळल्याने कार अक्षरशः चपटी झाली आहे. सुदैवाने सदरील कारमधील अभियंता जी. अजयकुमार आणि ए. व्यंकटेश हे दोघे चहा पिण्यासाठी बाजूच्या हॉटेलमध्ये गेले असल्याने ते बचावले. हे दोन्ही अभियंता लातूर-परळी महामार्गाच्या कामावर रुजू असून ते हैदराबाद येथून पुसला येऊन परळी रोडवरील डांबर प्लांटकडे निघाले होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज ते बचावले अशी भावना ग्रामस्थांनी बोलून दाखवली.



# वादळी वाऱ्याचा तडाखा;वीज पुरवठा खंडित

परळी / प्रतिनिधी

मागील अनेक दिवसांपासून ४० अंशावर गेलेल्या तापमानाने परळी शहर व तालुक्यात होरपळून निघाला असताना रविवार रोजी दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला.अचानक आलेल्या या वादळी वाऱ्याने अनेकांची तारांबळ उडत मोठ्या प्रमाणावर पशुधन व नागरिक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

परळी शहर व तालुक्यात रविवार दि २६ रोजी दुपारच्या सुमारास सोसाट्याच्या वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाट होऊन हलक्या स्वरूपाचा अवकाळी बरसला.तासी ४० ते ५० किमी पेक्षा अधिक वेगाने वारे वाहून पाऊस पडत असल्याने अनेकांची तारांबळ उडाली.शहरात अनेक भागात झाडे तुटून रस्त्यावर पडली, विजेचे खाब वाकडी झाली.दुकानावरील फलक रस्त्यावर येऊन पडली तर ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांच्या पत्र्याच्या घराचे नुकसान झाले.शहरात विजेचा तारा तुटून पडल्याने







अनेक भागात वीज पुरवठा खंडित झाला होता.या वादळी वाऱ्यामुळे

परळी तालुका तालुक्यात २ बकरी १ बकरा (मौजे नाथरा येथील संभाजी सूर्यवंशी),१ म्हैस दुधाळ मोठी(मौजे वसंतनगर येथील गोविंद सीताराम चव्हाण), २बैल मोठे (मौजे कण्हेरवाडी येथील महादेव भाऊराव मुंडे यांचा १ व नंदागौळ येथील परसराम कुंडलिक गित्ते यांचा १),१गाय दुधाळ मोठी(मौजे कण्हेरवाडी येथील उषा ज्ञानोबा मुंडे), ३० कोंबड्या(मौजे कण्हेरवाडी येथील शिवाजी शंकर मुंडे) तर

मौजे दौनापूर येथील ८ व्यक्ती झाड अंगावर पडून किरकोळ जखमी तर परचुंडी येथील एक व्यक्ती जखमी जखमी झाला आहे.घटनेची माहिती मिळताच परळी तहसीलचे नायब तहसीलदार बाबुराव रुपनर आणि त्यांची टीम तात्काळ घटनास्थळी भेट देत १०८ नंबरला कॉल करून म्बुलन्स गाडी बोलून जखमींना तात्काळ दवाखान्यात दाखल करण्याचं काम केले आहे

# बीड जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्रांची संख्या ८२ हजार पार

## प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या जाती काढणाऱ्यांना चपराक

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मराठा-कुणबी, कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्र वाटपाच्या संख्येने ८२ हजारांचा आकडा ओलांडला असून, जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कामगिरीमुळे बीड जिल्ह्यात महाराष्ट्रात सर्वाधिक कुणबी नोंदी बीड जिल्ह्यात आढळल्या आहेत. विशेष म्हणजे एका विशिष्ट जातीतील अधिकारी यांना लक्ष्य करत त्यांच्या कार्य-कर्तृत्वार प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या काही मोजक्या लोकांना ही मोठी चपराक असल्याचे मानले जात आहे.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात



जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या नेतृत्वात आतापर्यंत २७ लक्ष पेक्षा अधिक कुणबी नोंदी तपासल्या गेल्या असून, आज पर्यंत तब्बल ८२ हजार ५४५ जणांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. विशेष म्हणजे हा आकडा मराठवाड्यासह महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. याउपर आणखी सुमारे ८ ते १० हजार प्रमाणपत्रे पडताळणी मध्ये असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

महाराष्ट्रात मराठा समाजाच्या आंदोलन कार्याला आलेल्या यशानंतर राज्य शासनाने विशेष मोहीम राबवत कुणबी नोंदी शोधण्याचे व त्यावरून कुणबी प्रमाणपत्र देण्याचे कार्य युद्ध पातळीवर सुरू केले. यामध्ये बीड जिल्हा सर्वात पुढे आहे. विशेष म्हणजे मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात निवडणूक आचारसंहिता व प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पार पडली असून, त्याचा कुणबी प्रमाणपत्र वातपावर कोणताही परिणाम होणार नाही याची परिपूर्ण काळजी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या नेतृत्वात जिल्हा प्रशासनाने घेतली आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत देखील हा मुद्दा मोठ्या प्रमाणावर गाजला. एका विशिष्ट जातीतील अधिकारी वर्गाला या दरम्यान लक्ष्य करत सातत्याने आरोप करण्यात आले. मात्र त्याच अधिकाऱ्यांनी गतिमान प्रशासन राबवत बीड जिल्ह्यात राज्यात सर्वाधिक कुणबी नोंदी तपासत सर्वाधिक कुणबी प्रमाणपत्र वाटप केली असून, हा आकडा आणखी दिवसेंदिवस वाढणार आहे. नुकतीच पार पडलेली लोकसभा निवडणुक व त्यादरम्यान विविध जातींच्या नावाने उठवण्यात आलेली राळ या सर्वांना ही आकडेवारी चकित करणारी असून, सुज्ञ मराठा बांधवांकडून मात्र पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वातील बीड जिल्हा प्रशासनाचे आभार व्यक्त केले जात आहेत.

## अरबिया सय्यद चे इयत्ता दहावीच्या परिक्षेत घवघवीत यश तसेच

## समीर सय्यद ने दहावीच्या परीक्षेत यश प्राप्त केले





गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : चकलांबा येथील जि. प. मध्यामिक शाळेतील विद्यार्थींनी तसेच, पत्रकार सय्यद गफ्फार यांची कन्या अरबिया गफ्फार सय्यद हिने दहावीच्या परीक्षेत ८९.२० टक्के गुण मिळवुन घवघवीत यश प्राप्त केले आहे.व तसेच, पत्रकार सय्यद गफ्फार यांचा पुतण्या समीर इस्राईल सय्यद यानेही इयत्ता दहावी जि.प.शाळेमध्ये शिक्षण घेत ८३.८० टक्के गुण मिळवुन यश संपादन केले आहे.

# स्त्री रुग्णालयात चाललंय काय...?

## औषध गोळ्यांचा तुटवडा तर डॉक्टर यांची उशिरा उपस्थिती ?

नेकनुर ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर येथील स्त्री रुग्णालय मध्ये गोळ्या औषधांचा तुटवडा अनेक दिवसांपासून दिसू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयामध्ये रुग्णांची हेळसांड होताना सुद्धा पाहायला मिळत आहे. अनेक औषध तसेच गोळ्या बाहेरून घेण्याचे डॉक्टर सांगत आहेत. पित्त गोळी, खोकल्याचे औषध तसेच अनेक प्रकारच्या गोळ्या डॉक्टर बाहेर घेण्यास सांगतात. औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे गोरगरीब रुग्णांचे हाल होत असून, त्यांना औषधे विकत घ्यावी लागत आहेत. गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवा व्यवस्थित मिळाव्यात आणि नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी सरकारने जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू केली आहेत. गोरगरिबांना कोणत्याही प्रकारे त्रासाला सामोरे जावे लागू नये, त्यांच्यावर व्यवस्थित उपचार व्हावे यासाठी आरोग्य विभागाकडून ४०० पेक्षा अधिक प्रकारच्या गोळ्या-औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरवला जातो.

मात्र, बीड तालुक्यातील नेकनुर येथील स्त्री रुग्णालय नेकनूर मध्ये अनेक प्रकारच्या गोळ्या-औषधे उपलब्ध नाहीत. काही दिवसांपासून या रुग्णालयामध्ये सुविधांचा बोजवाराही झाला आहे. एकतर डॉक्टरांची वेळेवर उपस्थित न राहणे त्यात औषधांचा तुटवडा यामुळे परिसरातील गोरगरीब जनता त्रस्त झाली आहे. डॉक्टरांकडून औषधे लिहून दिली जातात; मात्र औषध देणारे कर्मचारी गोळ्या बाहेरून घ्या, असे सांगतात. येथे जखमेवरील औषधे, टीबी, बीपीवरील गोळ्याही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी दहा गोळ्या लिहून दिल्या, तर कर्मचारी फक्त चारच देतात. अनेकदा औषध असूनही नसल्याचे कर्मचारी सांगतात.

सध्या औषध उपलब्ध नसल्याने बाहेरून औषधे विकत घ्या, असे स्त्री रुग्णालय नेकनुर येथील कर्मचारी रुग्णांना




**नर्सची पत्रकार बांधवाला अरेरावीची भाषा**
**ठराविक मेडिकल वरून औषध खरेदीचा डॉक्टर व नर्सचा आग्रह.**

सांगत आहेत. रुग्णालयाचा भोंगळ कारभारामुळे मात्र रुग्णांचा जीव टांगणीला लागला आहे. नर्सची पत्रकाराला सुद्धा अरेरावीची भाषा, रविवारी सकाळी ११ वाजता पत्रकार अभिजीत पवार नामक त्या ठिकाणी रुग्णालयामध्ये गेले असता त्यांना सुद्धा तुम्ही सकाळी लवकर यायचे ना दहाच्या अगोदर आमच्या मागे आता खूप काम आहे. आता होणार नाही नंतर या अशा प्रकारचे नर्स ने पत्रकाराशी सुद्धा म्हटले आहे. नंतर डॉक्टरला फोन करून पत्रकाराने विचारले असता मी पत्रकार आहे असे म्हटल्यावर लगेच नर्सने दखल घेतली. जर पत्रकारांना अशा गोष्टींना सामोरे जावे लागते तर सामान्यांचे काय यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

उन्हाळा वाढत असल्याने वातावरणात बदल झाले आहेत. त्यामुळे विविध आजारांनी डोके वर काढले आहे. शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या रांगा लागत आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात गोरगरिबांचा समावेश आहे. परंतु या शासकीय आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांमध्ये नाराजी आहे. मोफत उपचार मिळावे म्हणून गोरगरीब जनता प्राथमिक आरोग्य केंद्रात येतात; मात्र औषधे नसल्याने हजारो रुपयांचे औषध घेण्याचे प्रसंग गोरगरीब जनतेवर येत आहे. रविवार दिवशी गर्दी असल्यामुळे तेथील येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना बाहेरूनच औषधे घ्यावी लागत होती. नेकनूर मध्ये मोठी बाजारपेठ असल्यामुळे त्या ठिकाणी पंचक्रोशीतील नव्हे तर जिल्ह्यातील व्यापारी वर्ग शेतकरी वर्ग त्या ठिकाणी आपली जनावरे विकण्यासाठी येत असतात. या दिवशी रुग्णालयामध्ये गर्दी निर्माण होते.

डॉक्टरांकडून औषधे लिहून दिली जातात; मात्र औषध देणारे कर्मचारी गोळ्या बाहेरून घ्या, असे सांगतात. येथे जखमेवरील औषधे, टीबी, बीपीवरील गोळ्याही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी दहा गोळ्या लिहून दिल्या, तर कर्मचारी फक्त चारच देतात. अनेकदा औषध असूनही नसल्याचे कर्मचारी सांगतात.

## जवाहर विद्यालयाचा दहावीचा निकाल ९३.५४ टक्के

माजलगाव :महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९३.५४ टक्के लागला असून निकिता कोरडे ९८.८०, वैष्णवी कोरडे ९५, मयूरी गिरगुणे ९४.४०, ओमकार राठोड ९३.४०, गायत्री जगताप ९१.८०, गायत्री कदम ९१.४०, आर्यन जगताप ९० अविनाश चव्हाण ८९.४०, विवेक पवार ८९.२०, वैष्णवी उंबरे ८९, ऋषभ गवळी ८८.२०









असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, उपाध्यक्ष ड.आर.डी.भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी.देशमुख,संचालक शिरीष देशमुख,डॉ.सचिन देशमुख, राहुल मुळी, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक संतोष जोशी यांनी अभिनंदन केले.

## चि.उत्कर्ष सोनसळे याचे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

मार्चमध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल आज दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर झाला.त्यामध्ये श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय माजलगाव येथे इयत्ता दहावी मध्ये शिकत असलेला चि.उत्कर्ष बाळासाहेब सोनसळे याने ९९.४०% गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. त्याला संस्कृत १००, गणित १००, विज्ञान ९८, सामाजिक शास्त्र ९३, इंग्रजी ९१, मराठी ८५ असे गुण मिळाले. प्रसिद्ध व्याख्याते तथा जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा माजलगाव येथे कार्यरत असणारे माध्यमिक शिक्षक बाळासाहेब सोनसळे व



जिल्हा परिषद पात्रुड या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या प्राथमिक शिक्षिका रामकवर सोनसळे

यांचे चिरंजीव असणारा उत्कर्ष याला विज्ञान शाखेतून शिक्षण घेऊन पुढे डॉक्टर व्हायचे आहे.त्याची बहीण कु.सृष्टी बाळासाहेब सोनसळे ही देखील परभणी मेडिकल कॉलेज या ठिकाणी एम.बी.बी.एस करत आहे.

## गेवराईत आज श्री स्वामी समर्थ यांच्या पालखीचे आगमन

गेवराई । प्रतिनिधी

शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही अन्न छत्र मंडळ अक्कलकोट श्री. स्वामी समर्थ यांच्या पालखीचे आगमन आज सोमवार, दि.२७ मे २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता गेवराई येथील वाणी मंगल कार्यालय जायकवाडी वसाहत गेवराई येथे होत आहे. तरी भक्तगण मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पालखी संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



गेवराई शहरातील वाणी मंगल कार्यालय, जायकवाडी वसाहत गेवराई येथे सायंकाळी ठिक ६ वाजता स्वामींच्या पालखीचे आगमन होईल तदनंतर संध्याकाळी ७.३० वाजता आरती व नंतर आठ ते दहा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी सर्व स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. स्वामी समर्थ पालखी संयोजक सदस्य संदीप राजगुरु, अविनाश कुलकर्णी, राजेंद्र सिकची, संदीप सिकची, . अनंत वडघणे, श्रीपाद रामदासी, सुधीर जोशी, राहुल पाठक, अनंत वडघणे, गोपाल लखोटिया यांनी केले आहे.

# तीन रुपयांच्या गोळीमुळे हार्ट अटॅकपासून बचाव

आपल्याला छातीत कळ येऊन प्रचंड अस्वस्थ वाटत असेल. हात, मान आणि जबडा येथे ताठरता येऊन श्वास घेण्यास त्रास होत असेल, घाम आला असेल आणि चक्कर येत असेल तर ही हार्ट एटॅकची संभाव्य लक्षणे असल्याने अशा लक्षणा वेळी आपल्याला तीन रुपायांची गोळी वाचवू शकते.

एस्पिरिन गोळीच्या सेवनाने हार्ट अटॅकला रोखता येऊ शकतो. यासंदर्भात अनेकदा बोलले आणि लिहीले गेले आहे. छातीत अचानक खूपच दुखत असेल आणि अस्वस्थ वाटत असेल तर चार तासांच्या आत एस्पिरिनची गोळी घ्यावी. यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होऊ प्राण वाचू शकतात यावर जर्नल ऑफ अमेरिकन हार्ट असोसिएशनने केलेल्या अभ्यासात पुन्हा एकदा संशोधन प्रसिद्ध झाले आहे. अर्थात एस्पिरिन गोळी तूम्ही अत्यंत सावधानता पूर्वक घेतली पाहीजे असेही डॉक्टरांनी म्हटले आहे. ज्यांना एलर्जी असेल त्यांनी जास्त काळ ही गोळी घेऊ नये असाही सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

अमेरिकेत १३,९८० लोकांचे वाचले प्राण

अमेरिकेत यासंदर्भात एक अभ्यास करण्यात आला, वेळेआधी हृदयाचा धक्का बसल्यास आणि छातीतून खूपच कळा आल्यास सेल्फ एडमिनिस्ट्रेशनवर झालेल्या अभ्यासातून एक निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्यात ३२५ मिलीग्राम एस्पिरिनच्या प्रारंभिक सेवनाने साल २०१९ अमेरिकेत १३,९८० एक्युट मायोकार्डियलने होणारे मृत्यूचे प्रमाण घटल्याचे पुढे आले आहे.

एस्पिरिन गोळी तूम्ही अत्यंत सावधानता पूर्वक घेतली पाहीजे. जेव्हा रुणाला खूप जोराने छातीत काही तरी तुटल्यासारखे दुखत असेल आणि घाम आला असेल तसेच चक्कर येत असेल तर अशावेळी ३२५ एमजीची एस्पिरिनच्या तीन गोळ्या क्रशकरून लागलीच खाऊ शकता. त्याशिवाय तुम्ही अतिरिक्त ५ एमजी सोरबिट्रेट देखील जिभेखाली ठेवू शकता त्यामुळे छातीत कळा कमी होतील.

या लक्षणावेळी गोळी खावी

आपल्याला छातीत कळा येऊन अस्वस्थ



वाटत असेल. बाहूंमध्ये, मान आणि जबड्यात वात आला असेल, श्वास घेण्यास त्रास होत असेल, घाम आला असेल आणि चक्कर येत असेल तर ही हार्ट एटॅकची संभाव्य लक्षणे असल्याने अशा लक्षणावेळी एस्पिरिन गोळी खाण्याचा सल्ला दिला जातो असे अपोलो एओर्टिक प्रोग्रॅमचे वरिष्ठ सल्लागार आणि सर्जिकल प्रमुख डॉ. निरंजन हिरेमठ यांनी सांगितले. एस्पिरिनची गोळी रक्त पातळ करण्यास आणि रक्ताच्या गाठी बनण्यास प्रतिरोध करते असेही त्यांनी सांगितले.

'स्पिरिन सायक्लो-ऑक्सिजनेस प्रतिबंधित करून अँटी-प्लेटलेट एजंट म्हणून कार्य करते, ज्यामुळे थ्रोम्बोक्सेन ए २ चे उत्पादन कमी होते, एक अणू जो प्लेटलेट एकत्रीकरण आणि व्हॅसोकॉन्स्ट्रक्शनला प्रोत्साहन देतो, असे धर्मशिला नारायण रुग्णालयाच्या कार्डिओलॉजीचे संचालक आणि वरिष्ठ सल्लागार डॉ. समीर कुब्बा यांनी म्हटले आहे.

अल्सर असलेल्या लोकांना सूचना

रक्ताच्या गुठळ्या बनण्याची क्रिया रोखण्यास मदत करण्यासाठी छातीत कळ आल्यानंतर लागलीच एस्पिरिनची गोळी खायला हवी असेही त्यांनी सांगितले. मात्र ज्या लोकांना एस्पिरिन गोळीची एलर्जी आहे त्यांनी सावधान रहायला हवे. आम्ही इतर नॉन-स्टेरॉइडल अँटी-इंफ्लेमेटरी ड्रग्स, तसेच सक्रिय गॅस्ट्रोइंटेस्टाइनल रक्तस्त्राव, रक्तस्त्राव विकार किंवा गॅस्ट्रोइंटेस्टाइनल अल्सर किंवा रक्तस्त्राव स्ट्रोकचा इतिहास असलेल्या लोकांना ऍस्पिरिन गोळी टाळण्याची शिफारस करतो असे श्री बालाजी एक्शन मेडीकल इन्स्टिट्यूटमधील इंटरवेंशनल कार्डिओलॉजी सल्लागार डॉ. संजय परमार यांनी सांगितले आहे.

खूप काळ एस्पिरिन खाणे धोकादायक

एस्पिरिनच्या साईड इफेक्टने रक्तस्राव होऊ शकतो. परंतू सर्वसाधारणपणे एका डोसने असे होण्याची शक्यता खूपच कमी असते असे मॅक्स सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे हृदय विज्ञान गटाचे अध्यक्ष डॉ.बलबीर सिंह यांनी सांगितले. पेप्टिक अल्सर असेल तर एस्पिरिन अधिक रक्तस्राव होण्यास जबाबदार ठरू शकते. अशा वेळी पेशंटला रुग्णालयात भरती केले जाणार असल्याने आपात्कालिन स्थितीत एस्पिरिन फायदेशीर होऊ शकते असे डॉ. बलबीर सिंह यांनी सांगितले. जर रुग्णामध्ये हृदयरोगाचा किंवा पक्ष घाताचा कोणताही इतिहास नसेल तर खूप काळ एस्पिरिन खाणे धोकादायक ठरु शकते असाही सल्ला सर गंगाराम रुग्णालयाच्या कार्डिओलॉजिस्ट विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. अश्विनी मेहता यांनी सांगितले. अशा रुग्णामध्ये रक्तस्रावाची जोखीम हृदय विकाराचा धक्का रोखण्यापेक्षा अधिक गंभीर असू शकते असेही मेहता यांनी सांगितले.



## वारंवार होणारा खंडीत वीज पुरवठा सुरळीत करा

### विविध समस्यांविरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उप जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**
**गेल्या अनेक दिवसांपासून केज मतदार संघात विज पुरवठा खंडीत झाल्याने नागरिकांना त्याचा नाहक त्रास होत आहे. अशा परिस्थितीत मतदार संघात विविध ठिकाणी महावितरण अवेळी विजपुरवठा खंडीत होत आहे शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीही वाईट असून शेतकरी मानसिकदृष्ट्या खचला आहे. ज्या शेतकऱ्याकडे स्वत:चे थोडेफार पाणी आहे तो विजेअभावी वेळेवर जनावरांना पाणी देवू शकत नाही. तसेच शेतीलाही पाणी देवू शकत नाही.दिवसातून वारंवार विजपुरवठा खंडीत होत आहे.**

याचा परिणाम केज मतदार संघात होणाऱ्या पाणी पुरवठ्यावरही होत आहे. तसेच नागरिकांच्या मुलभूत सुविधा व इतर कामे वेळेवर होत नाही. यापुढे विजपुरवठा खंडीत होणार नाही याची दखल घेण्यात यावी. व तसेच काल दि.२६ मे रोजी अवकाळी पाऊस व वादळी वारा आल्यामुळे घरावरील पत्रे, शेतातील गोठे, उडून गेली आहेत तसेच फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या बाबत तात्काळ पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्यात यावी.अन्यथा येणाऱ्या काळात आपल्या कार्यालयासमोर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल.असा इशारा देण्यात आला.यावेळी उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथे निवेदन देण्यात आले.यावेळी उपस्थित राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने बुद्ध जयंती साजरी

बीड ।प्रतिनिधी
ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दिनांक २३ मे २०२४ रोजी बीड येथे बुद्ध जयंती चे आयोजन करण्यात आले होते. बुद्ध पौर्णिमेचा शुभ सण राजकुमार सिद्धार्थ गौतम यांचा जन्म, जो गौतम बुद्ध बनला आणि बौद्ध धर्माची स्थापना केली. पवित्र सण बुद्धाचा जन्मदिवस, बुद्ध दिवस किंवा बुद्ध जयंती म्हणूनही ओळखला जातो. प्रामुख्याने बौद्ध सण,

हा दिवस भारत, श्रीलंका, नेपाळ, भूतान, थायलंड, तिबेट, चीन, कोरिया, लाओस, व्हिएतनाम, मंगोलिया, कंबोडिया, इंडोनेशिया आणि दक्षिण आशियातील बहुतेक दक्षिण, आग्नेय आणि पूर्व आशियामध्ये साजरा केला जातो. अधिक हे हिंदू महिन्यातील वैशाखच्या पौर्णिमेच्या दिवशी पाळले जाते, जे एप्रिल किंवा मे मध्ये येते. बौद्ध लोक विविध धार्मिक समारंभ आणि विधींमध्ये सहभागी होऊन मोठ्या भक्ती आणि आनंदाने दिवस साजरा करतात. बुद्धाच्या जन्म आणि मृत्यूच्या अचूक तारखा अज्ञात असताना इतिहासकारांचा अंदाज आहे की, त्यांचे आयुष्य ५६३-४८३ बीसी दरम्यान आहे. गौतम बुद्ध यांचा जन्म लुम्बिनी, नेपाळ येथे झाला आणि ३५ व्या वर्षी त्यांनी निर्वाण प्राप्त केले. बुद्ध पौर्णिमा हा बौद्ध धर्माच्या मुख्य तत्त्वांवर चिंतन करण्याचा दिवस म्हणून साजरा केला जातो. शांती, करुणा आणि ज्ञान. दक्षिण आणि आग्नेय आशियाच्या काही भागांमध्ये, हा सण वेसाकशी एकरूप होतो - बुद्धाच्या ज्ञानाचा उत्सव आणि निर्वाणात त्यांचे निधन. हा सण शांतता आणि सौहार्दाचा संदेश देण्याची संधी देतो. दरम्यान, पौर्णिमेला बौद्ध धर्मात महत्त्व आहे. कारण गौतम बुद्धांच्या जीवनातील तीन महत्त्वपूर्ण घटना या दिवशी घडल्या. मे महिन्यातील पौर्णिमा विशेषतः महत्वाची आहे.

कारण राजकुमार सिद्धार्थ यांचा जन्म लुंबिनी ग्रोव्ह येथे झाला होता. दुसरे म्हणजे, राजकुमार सिद्धार्थ गौतम यांना बोधिवृक्षाच्या सावलीत ज्ञान प्राप्त झाले आणि सहा वर्षांच्या कष्टानंतर बोधगया येथे गौतम बुद्ध झाले. तिसरे म्हणजे ४५ वर्षांनी सत्य शिकवल्यानंतर, जेव्हा ते ऐंशी वर्षांचे होते, कुसिनारा येथे, ते निब्बाना (निर्वाण) - पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्त झाले. कार्यक्रमाच्या शेवटी खीर दान व गौतम बुद्धांच्या ज्ञानाचे धडे देण्यात आले. तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्त ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विजय विद्यागर व सर्व पदाधिकारी, संस्थेचे प्रतिनिधी कर्मचारी ग्रंथ प्रामुख्याने उपस्थित होते.



## गेवराईत आज श्री स्वामी समर्थ यांच्या पालखीचे आगमन

### स्वामी भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे

गेवराई ।प्रतिनिधी
शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही अन्न छत्र मंडळ अक्कलकोट श्री. स्वामी समर्थ यांच्या पालखीचे आगमन आज सोमवार, दि.२७ मे २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता गेवराई येथील वाणी मंगल कार्यालय जायकवाडी वसाहत गेवराई येथे होत आहे. तरी भक्तगण मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पालखी संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

गेवराई शहरातील वाणी मंगल कार्यालय, जायकवाडी वसाहत गेवराई येथे सायंकाळी ठिक ६ वाजता स्वामींच्या पालखीचे आगमन होईल तदनंतर संध्याकाळी ७.३० वाजता आरती व नंतर आठ ते दहा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे,



तरी सर्व स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. स्वामी समर्थ पालखी संयोजक सदस्य संदीप राजगुरु, अविनाश कुलकर्णी, राजेंद्र सिकची, संदीप सिकची, . अनंत वडघणे, श्रीपाद रामदासी, सुधीर जोशी, राहुल पाठक, अनंत वडघणे, गोपाल लखोटिया यांनी केले आहे.

### राष्ट्रीय समाज पार्टी आयोजित दिल्ली या ठिकाणी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी

## होळकर यांच्या जयंती उत्सव सोहळ्यास मोठ्या प्रमाणात उपस्थित रहावे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर

बीड ।प्रतिनिधी
राष्ट्रीय समाज पार्टी आयोजित राजमाता पुण्यश्लोक आयोजित होळकर जयंती उत्सव ३१.मे रोजी दिल्ली या ठिकाणी राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती होणार आहे, या कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे, राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक महादेवजी जानकर, हे उपस्थित राहणार आहेत, , या जयंती सोहळ्यास मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आव्हान जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी केले,

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती आली आहे.संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरी करण्यात येत असते. तळागळात, मोठ्या प्रमाणात जयंती साजरी झाली पाहिजे.राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी सर्व समाजाला आव्हान केल आहे. .शासनाच्या वतीने आदेश काढून प्रत्येक शासकीय कार्यालय ग्रामपंचायत मध्ये जयंती प्रत्येक समाजातील लोकांनी महापुरुषांचे विचार घेऊन आपलं जीवन सुख समृद्ध करण्यासाठी महापुरुषांच्या विचारावर चालावे यासाठी या जयंती घेणे आवश्यक आहे यामध्ये दारू पिणे नाचणे अनर्थ पैसा वाया घालण्यापेक्षा व्याख्यान माहिती घेणे गरजेचे आहे. महापुरुषांच्या त्यांनी केलेल्या त्यागाचा व त्यांच्या विचारांच्या आत्मसमान जयंतीच्या माध्यमातून केला पाहिजे म्हणून राष्ट्र नाईक महादेव जानकर साहेब यांनी देशभरात पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांच्या विचार पोहोचले पाहिजेत त्यामुळे दिल्ली येथे जयंतीचे आयोजन केले आहे.



दिनांक ३१ मे रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी. राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करून त्यांच्या विचाराचा वसा सर्वसामान्य माणसापर्यंत गेला पाहिजे अस आव्हान राष्ट्रीय समाज पक्षाचे दबंग जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी केल आहे.

## अखेर चकलांबा पोलीस ठाण्यात १८ माफियांविरोधात गुन्हे दाखल; पुढील तापस सुरू

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई : स्वतःचे वर्चस्व अबाधित राहावे यासाठी गोदापात्रात दोन वाळू माफियांचे गट भिडल्याचा प्रकार समोर आला होता. या घटनेत पाच ते सहा जण जखमी झाले होते. तसेच यातील काही जणांनी वाहने देखील पेटवून दिली होती. एवढं सगळं घडून गेल्यानंतर ही दोन्ही गटाकडून तक्रार आले नसल्याचे कारण देत चकलांबा पोलिसांनी गुन्हे दाखल केले नसल्याचे पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यानंतर अखेर १८ जणांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहे.

चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील बोरगाव बु.परिसरातील गोदापात्रात गेवराई तालुक्याच्या हद्दीत आहे. तर पलीकडे नगर जिल्ह्याची हद्द येते, नगर जिल्ह्याच्या हद्दीमध्ये मुंगी येथील वाळू माफियांची कायमची दहशत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आलेले आहे. मुंगी दगडफेक, मोटरसायकलींची जाळपोळ, सहा जण जखमी, येथील वाळू माफियांची गुंडगिरी करून दहशत माजवून सर्रासपणे गोदापात्रातील वाळूची तस्करी करत आलेले आहेत. त्यांच्या अनेक तक्रारी पोलिस आणि महसूल प्रशासनाकडे आहेत. मात्र (दि.२४ मे) च्या रात्री बोर गावातील जाधव आणि ढाकणे गटात वर्चस्वाच्या वादातून तुफान हाणामारी झाली. या हाणामारीत सहा जण रक्तबंबाळ झाले, त्यांना जखमी अवस्थेत छत्रपती संभाजी नगर येथील रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आली होते. दोन्ही गटाकडून गावात प्रचंड दहशत पसरण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर भर रस्त्यावर तीन ते चार मोटरसायकली जाळून टाकण्यात आल्या, अनेक ठिकाणी दगडफेकही करण्यात आली. घटना घडवून दीर्घ गेल्यानंतर ही पोलिसांनी गुन्हा दाखल केले नव्हते, मात्र पोलीसांवर टीका करण्यात आल्यानंतर अखेर १८ जनावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गढवे हे करीत आहेत.

## असामान्यातील सामान्य मुलगी! नक्षत्रा शेळके!

सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक, वडील इंजिनियर सध्या बांधकाम मटेरियल व्यावसायिक आणि आई दातांची डॉक्टर म्हणजे बीडीएस ...मग यांची नात ,मुलगी एखाद्या भारी शाळेला असली पाहिजे आणि असायलाही पाहिजे...ही मुलगी आहे बार्शीची नक्षत्रा रणजितसिह शेळके...घरची परिस्थिती यांच्या पदावरून आपल्या लक्षात आली असेलच,ती काही वेगळी सांगायला नको...

इथं हे एवढ्या साठी सांगायची वेळ आली कारण आज समाजामध्ये आईवडील शेतात राबतात,मोलमजुरी करतात,कर्ज काढतात आणि मोठ्याल्या फि असलेल्या शाळेत घालतात ...तर का ? मोठ्याला शाळेत घातलं म्हणजे पाल्य लै हुशार होतंय.. हा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्याचा मानसिक आजार मध्यम वर्गीय व निम्मं मध्यम वर्गात व एकदम उत्पन्न कमी असलेल्या कुटुंबात सध्या वाढलेला आहे...

फक्त आपला पाल्य पिवळ्या गाडीतून मोठ्या शाळेत जाऊन घरी येऊन ममे आणि डॅडी म्हणला की त्याला लै इंग्रजी आल आणि आपला पाल्य लै हुशार झाला असा समज होतो,आणि पालकांचा तो समज साधारण पणे चौथी पाचवी पर्यंत रहातो आणि मग कळायला लागत की अरे याला काहीच येत नाय..आणि त्याला पहिली पासून शाळा ट्यूशन लावून आपण यामध्ये त्याच बालपण सगळं तोडून मोडून काढलेले असते....

नक्षेत्रा ने बार्शीतील सेंट जोसेफ, पोदार, सुयश या शाळा मधून ८,१० दिवस जाऊन पाहिले आणि तिच्या सुज्ञ पालकांच्या लक्षात आले की फक्त स्कॉलरशिप म्हणजे जीवन नाही,आणि घोकंपट्टी म्हणजे अभ्यास नाही...या शाळेतून तिला तातडीने काढून छान जिजामाता विद्या मंदिर या मराठी प्राथमिक शाळेत प्रवेश घेतला...

मी तिच्या कुटुंबातील सर्वांना विचारले ही की असे का केले...तर त्यांनी साधं उत्तर दिलं की शिक्षण ही निरंतर चालणारी गोष्ट आहे,पाल्य घडला पाहिजे पण तो त्याच्या मनावर ताण न येऊ देता,आणि आपण



मुलाचा लहानपणीच मराठी भाषेतून पाया पक्का केला की तिला आयुष्यात कोणतीच भाषा अवघड जात नाही..! आणि आपले समाजातील काही जण इथेच मार खातात...कोणताच विचार करीत नाहीत... १ हजाराच्या स्कॉलरशीप साठी ६ हजार रुपयांची ट्यूशन लावतात ...आणि लेकराच बालपण कोमेजून टाकतात... आज या नक्षत्रा चा वाढदिवस...! घरी गेलो की पटपट बोलून आपलीशी करणारी ही परी,सर्व इलेक्ट्रॉनिक गॅझेट वापरणारी,वर्गातील सर्व ऍक्टिव्हिटी मध्ये पुढे असणारी ही बोलघेवढि पोरगी... हिला यश,कीर्ती लाभो ,तिला उत्तम आरोग्यादायी आयुष्य लाभो हीच भगवंत चरणी प्रार्थना... नक्षेत्रा खूप खूप शुभेच्छा व अनेक आशीर्वाद बाळा...!

शब्दांकन
अनिल देशपांडे बार्शी
९४२३३३२२३३

## राष्ट्रीय कविता महोत्सवात डॉ.प्रवीण काळे यांनी उमटवला वेगळा ठसा

माजलगाव । प्रतिनिधी
कालिकत केरळ येथे संपन्न झालेला राष्ट्रीय कविता महोत्सव २०२४ मध्ये माजलगावचे प्रतिनिधित्व करणारे आपल्या कवितांनी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगळी छाप सोडणारे कवी डॉ. प्रवीण काळे यांनी केरळ येथील कालिकत येथे संपन्न झालेल्या कविसंमेलनात, परिसंवादात सहभागी होत वेगळी छाप उमटवली या मोहत्सवास प्रमुख उपस्थिती प्रसिद्ध साहित्यिक डॉ. निलेश त्रिपाठी (कोलकाता) लेखक डॉ.सुखदेव सिंग सिरसा (पंजाब) प्रसिद्ध साहित्यिक डॉ.सिवन कुट्टी (केरळ) साहित्य अकादमी सदस्य डॉ.सुनिल गायकवाड (चाळीसगाव) कविवर्य मा.देविदास फुलारी (नांदेड) हिंदी अनुसंधान केंद्राचे प्रमुख डॉ .संजय बोरुडे (अहमदनगर) प्रसिद्ध कवी चंद्रकांत बाबर (सांगली) यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध सत्रांमध्ये चाललेल्या कार्यक्रमात विविध राज्यातून अनेक कवींनी आपला सहभाग नोंदवला विविध भाषांमध्ये आपल्या कविता परिसंवाद सादर केले. आपल्या माजलगावचे भूमिपुत्र कवी प्रवीण काळे यांनी भारतीय कविता आणि भूमिनिष्ठा या विषयावरील परिसंवादात आपले मत मांडत उपस्थितांची मने जिंकली


तीन सत्रांमधील कविसंमेलनात बाई बदलते आहे, हिंदी कविता भिडे वाडा, तसेच पर्यावरणाच्या संदर्भातील अभयदान की कडेलोट या कविता सादर करून उपस्थितांना अंतर्मुख केले. आपल्या सादीकरणाची वेगळी छाप सोडली. त्यांच्या या राष्ट्रीय पातळीवरील कवी संमेलनातील सहभागाबद्दल परिसरातील साहित्यिक कवी यांनी भरभरून कौतुक व शुभेच्छा दिल्या कविवर्य प्रभाकर साळेगावकर, कवयित्री गौरी देशमुख, कवयित्री प्रतिभा थिगळे, कवयित्री दुर्गा राऊत, व्याख्याते गोविंद गोचडे,कवी दिपक पांढरे, कवयित्री लता जोशी,कवी मोहन राठोड, आदि.




### राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती

## सर्व शासकीय कार्यालयात साजरी करा, अमर वाघमोडे अंकुश गवळी यांचे आव्हान


बीड ।प्रतिनिधी
पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ३१.मे रोजी संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरी करण्यात शासनाच्या वतीने अनेक जयंतीच्या शासकीय सुट्ट्या दिल्या गेल्या आहेत, या सुट्टीच्या औचित्य साधून समाजातील अनेक घटकांनी जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो महापुरुषांच्या त्यांनी केलेल्या त्यागाचा व त्यांच्या विचारांच्या आत्मसमान करतात दिनांक ३१ मे रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी देशभरातील सर्व शासकीय कार्यालयात गाव वाडी वस्तीवर राजमाता

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करून त्यांच्या विचाराचा वसा सर्वसामान्य माणसापर्यंत गेला पाहिजे असे आव्हान युवा नेते अमर वाघमोडे युवा पत्रकार अंकुश गवळी यांनी केले आहे,

## कु. हार्मीका बालाजी जगतकर हिचे दहावी बोर्ड परिक्षेत उत्तुंग यश

परळी । प्रतिनिधी
तुलसी इंग्लिश स्कुल बीडची विद्यार्थिनी कु.हार्मीका बालाजी जगतकर हिने राज्य माध्यमिक शालांत परिक्षेत ९१.८० टक्के गुण घेवून प्रथमश्रेणीत येण्याचा बहुमान मिळविला आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल तिचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.कु.हार्मीका बालाजी जगतकर हिने इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेमध्ये ९१.८०% गुण घेऊन उत्तुंग यश संपादित केले आहे. कु.हार्मिका ही तुलसी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सौ.उमाताई जगतकर व बीड अक्षरधामचं संपादक प्रा.बालाजी जगतकर यांची कन्या आहे.कु.हार्मिका हिने अथक परिश्रम सातत्यपूर्ण अभ्यास करून घरीच अभ्यास करून हे यश संपादन केले आहे.कु. हार्मिका ही खूप गुणवान असून लहानपणापासून विविध स्पर्धा परिक्षेतही तिने यश संपादन केले आहे. कु.हार्मिका हिने इंग्लिश विषयात ७१, मराठी ८४, हिंदी ८४, गणित ९३, सोशल ॲण्ड टेक्नॉलॉजी ९५, सोशल सायन्स या विषयात ८८ मार्क असे ५०० पैकी ४४४ मार्क घेतले आहेत. तिच्या या यशाबद्दल तुलसी इंग्लिश स्कुलच्या प्राचार्या, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पत्रकार बांधवांनी अभिनंदन केले आहे.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT